यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(नॅक नामांकित 'अ'श्रेणी)

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक, ४२२ २२२

आणि

भारतीय पुनर्वास परिषद, नवी दिल्ली (आर.सी.आय.)

शिक्षणशास्त्र विद्याशाखा

बी.एड.विशेष शिक्षण शिक्षणक्रम (P-21)

B.Ed.Spl.Ed. (HI, VI, ID)

माहितीपुस्तिका :२०२६-२९

	अनुक्रमणिका	पान.क्र.
१.	बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमासंबंधी माहिती	३
२.	शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर उपलब्ध संधी	४
३.	शिक्षणक्रमाची उद्दिष्ट्ये	५
४.	प्रवेश नियम भारतीय पुर्नवास परिषद, नवी दिल्ली	५
५.	आरक्षण तक्ता	६- ८
६.	प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रीये विषयी	८-१०
७.	प्रवेश पूर्व चाचणी संबंधित माहिती	१०-११
८.	निवड प्रक्रीये संबंधित माहिती	११-१२
९.	शिक्षणक्रम शुल्क	१२-१३
१०.	अर्जदाराने घ्यावयाची दक्षता	१३
११.	शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी मिळण्यात येणारी शिष्यवृत्ती बाबत	१३
१२.	ABC ID आणि DEB ID तयार करण्याबाबत सूचना	१४
१३.	शिक्षणक्रम संरचना	१४-१८
१४	संपर्क सत्रे	१९
१५	अध्यापन पद्धती आणि वैकल्पिक अभ्यासक्रम निवडी बाबत सूचना	१९-२०
१६	मूल्यमापन	२०
१७	अध्ययन आधार केंद्र यादी	२१-२२
१८	विभागीय केंद्रे	२२-२३
१९.	विद्यापीठातील संबंधित विभागाचे संपर्क	२३
२०	विद्यापीठाची वेब साईट	२३
	परिशिष्ट	
१.	संपर्क सत्र वेळापत्रक	२४-३०

१. बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमासंबंधी माहिती :

'विशेष शिक्षण' म्हणजे श्रवणबाधित, दृष्टीबाधित, बौद्धिक अक्षमता, अध्ययन अक्षमता असणारे, अस्थिव्यंग व मेंदुसंबंधित दुर्बलता असणाऱ्या म्हणजे विशेष शैक्षणिक गरजा असणाऱ्या विविध प्रकारच्या दिव्यांग मुलांचे शिक्षण होय. दिव्यांगाच्या विशेष शाळेत, मुख्य प्रवाहातील मुलांच्या शाळेत, समावेशित शिक्षणांतर्गत सर्व शाळांमध्ये प्रवेश दिलेल्या दिव्यांगाना त्यांच्या गरजांनुसार शिक्षण दिले जाते.

नवीन विचारधारेनुसार आता या मुलांना 'अपंग' असे संबोधले जात नाही. ह्या सर्व मुलांना 'विशेष गरजा असलेली म्हणजेच दिव्यांग मुले' असे संबोधले जाते. या मुलांचे शिक्षण प्रशिक्षित शिक्षकांशिवाय होऊ शकत नाही. हे विशेष शिक्षक-प्रशिक्षण ज्या महाविद्यालयास दिले जाते, त्या महाविद्यालयास 'विशेष शिक्षण अध्यापक महाविद्यालय' असे म्हणतात. भारतीय पुनर्वास परिषद (Rehabilitation Council of India), नवी दिल्ली यांच्याद्वारे या प्रशिक्षणासाठी अभ्यासक्रम ठरविला जातो. हा अभ्यासक्रम विद्यापीठात RCI यांच्याशी झालेल्या सामंजस्य करारानुसार राबविला जातो. या महाविद्यालयांची विद्यार्थी संख्या, प्रवेशाचे निकष यांना भारतीय पुनर्वास परिषदेची मान्यता असते. भारतीय पुनर्वास परिषदेच्या केंद्रीय नोंदणी रजिस्टर (CRR) मध्ये नाव नोंदविल्याशिवाय कोणतीही व्यक्ती विशेष शिक्षक म्हणून या क्षेत्रात काम करू शकत नाही.

अ) श्रेयांक : ८० (१ श्रेयांक म्हणजे ३० ते ३५ तासांचा अभ्यास)

आ) अभ्यास तासिका : २४००-२६०० घड्याळी तास

इ) शिक्षणक्रम कालावधी : सदर शिक्षणक्रमात पाच सत्रे म्हणजेच दोन वर्ष सहा महीने (अडीच वर्ष) किमान कालावधी असेल. शिक्षणक्रमाचा नोंदणी कालावधी पाच वर्षांचा असेल.

ई) अध्ययन साहित्य : अध्ययन साहित्य E-PDF स्वरुपात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

उ) शिक्षणक्रम माध्यम: प्रस्तुत शिक्षणक्रमाचे मराठी माध्यम असेल. या शिक्षणक्रमासाठी तयार केलेले सर्व अध्ययन साहित्य मराठीत असेल. ज्या अभ्यासक्रमांसाठी मराठीतील अध्ययन साहित्य उपलब्ध नसेल त्या अभ्यासक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपात इंग्रजीतील अध्ययन साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल. अभ्यासकेंद्रावरील समंत्रण आणि इतर कामकाजही मराठी माध्यमातून असेल. विद्यार्थी अंतर्गत कार्य आणि परीक्षा हिंदी अथवा इंग्रजी भाषेत देऊ शकतो.

ऊ) अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी व इंग्रजी दोन्ही माध्यमातून असतील. मराठी भाषेतील प्रश्नपत्रिका प्रमाण मानण्यात येईल.

<u>मुक्त विद्यापीठविषयी माहिती</u>

महाराष्ट्र शासनाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना १ जुलै १९८९ रोजी केलेली आहे. ज्यांचे औपचारिक शिक्षण अर्धवट राहिलेले असेल अशा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अर्थार्जन करीत असतानाही त्याचे अपूर्ण शिक्षण पूर्ण करण्यासाठी संधी उपलब्ध करून देता यावे. या हेतूने मुक्त विद्यापीठाची स्थापना झाली. दूरस्थ शिक्षणाचे अनेक लाभ आहेत. निर्भेळ ज्ञानसाधना करता येते. स्वतःची नोकरी, व्यवसाय वा उद्योग नव्या ज्ञान-कौशल्यांतून अधिक उत्तम करता येतो. हा अनुभव जगभरातील मुक्त विद्यापीठांच्या शैक्षणिक कार्यक्रमातून शिक्षण घेणाऱ्यांना येत आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे. सेवा-उद्योग करणाऱ्या युवक-युवतींच्या पुढील शिक्षणाचा विचार करणे अगत्याचे असले तरी ह्या विद्यापीठाने लोकविद्यापीठ बनण्याचे ध्येय समोर ठेवले आहे. शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे व त्यातून सामाजिक न्याय व समता निर्माण करणे, ही या मुक्त विद्यापीठाची उद्दिष्टे आहेत.

मुक्त विद्यापीठाची शिक्षणपद्धती दूरशिक्षण (Distance Education) असते. या पध्दतीत विद्यार्थ्याला स्वयं अध्ययन साहित्य दिले जाते. शैक्षणिक कार्यक्रमातील प्रात्यक्षिके, प्रयोग करता यावेत, ध्वनीफिती व चित्रफिती ह्यांचा लाभ व्हावा व तज्ज्ञ मार्गदर्शक अध्यापकांचे मार्गदर्शन घेता यावे, म्हणून विद्यापीठाच्या अध्ययन आधार केंद्रांवर संपर्कसत्रांसाठी

विद्यार्थांना उपस्थित राहावे लागते. या विद्यापीठाचे मुख्य कार्यालय नाशिक येथे असून अध्ययन आधार केंद्रे राज्यभर विखुरलेली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी नजीकच्या अध्ययन आधार केंद्राचा लाभ घेता येतो. या विद्यापीठाला २००२ आणि २०१९ या वर्षाचा Commonwealth of Learning या संस्थेचा Award of Excellence for Institutional Achievement' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेविषयी थोडेसे

या विद्यापीठात एकूण तेरा विद्याशाखा कार्यरत आहेत. त्यातील एक म्हणजे शिक्षणशास्त्र विद्याशाखा होय. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर या विद्याशाखेने १९९१ मध्ये सेवांतर्गत शिक्षकांसाठी बी.एड. १९९४ मध्ये एम. एड. शालेय व्यवस्थापन पदविका, १९९८ मध्ये सेवांतर्गत शिक्षकांसाठी बी.एड. तर १९९९ पासून स्वयं-साहाय्य गट बांधणी आणि बालसेविका यांसारखे प्रमाणपत्रपासून संशोधनापर्यंत शिक्षणक्रम सुरु केले आहेत ज्या आधारे विद्यापीठाला तळागाळातील लोकांपर्यंत बहुसंख्येने पोहोचणे शक्य झाले. वर्ष २०१५-१६ पासून बी.एड. विशेष शिक्षण HI आणि VI शिक्षणक्रम सुरु झाले. तसेच २०१६ पासून बी.एड.विशेष शिक्षण शिक्षणक्रम ID प्रवर्गातील शिक्षणक्रमही सुरु करण्यात आला आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२९ या शिक्षणक्रमाची प्रवेशप्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

दिव्यांग अध्ययन केंद्र / सेंटर फॉर डिसॅबिलीटी स्टडीज (CDS):

सेंटर फॉर डिसॅबिलीटी स्टडीज (सीडीएस) ची स्थापना सन २०२० मध्ये आणि विद्यापीठाच्या १७३ व्या व्यवस्थापन मंडळाच्या ठराव क्र. 173.3.1. नुसार करण्यात आली होती. दिव्यांग पुनर्वसन, समावेशीत शिक्षण या क्षेत्रातील गरजा भागविण्यासाठी हे दिव्यांग अध्ययन केंद्र शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत कार्यान्वित केले जाते.

या केंद्राचे मुख्य ध्येय म्हणजे दिव्यांगत्व आणि विशेष शिक्षण या क्षेत्रात मानवी संसाधने विकसित करणे तसेच समतोल अंगीकारणारा आणि समावेशक समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने कार्य करणे होय. ह्या केंद्रामार्फत शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक, विशेष शिक्षण क्षेत्रात काम करणारे व्यावसायिक यांच्या क्षमता आणि कौशल्ये वाढविण्यावर लक्ष केंद्रित केले जाते.

१.१. शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर उपलब्ध संधी

१. बी. एड. विशेष शिक्षण पूर्ण झाल्यावर समावेशित शिक्षणातील युनिटमध्ये शिक्षक म्हणून काम करता येते तसेच शाळेतील एकात्मिक शिक्षण केंद्रामध्ये पाच दिव्यांग मुलांमागे एका शिक्षकाची नियुक्ती केली जाते.
२. महाराष्ट्र शासनाच्या उपलब्ध आकडेवारीनुसार माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर विविध प्रकारच्या दिव्यांगाना शिकविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता आहे.
३. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर समग्र शिक्षा अभियानांतर्गत समावेशित Shadow शिक्षक /विशेष शिक्षक/फिरते शिक्षक म्हणून काम करता येते.
४. राष्ट्रीय शिक्षण मोहिमे अंतर्गत लवकरच विषयतज्ज्ञ, विशेष शिक्षक, रिसोर्स टीचर म्हणून या विशेष शिक्षकांची नियुक्ती केली जाणार आहे. त्यामुळे या शिक्षकांची अधिक गरज आहे.
५. नवीन शैक्षणिक धोरण (२०२०) नुसार विशेष शिक्षक म्हणून रोजगाराची संधी मिळू शकते.
६. प्रशिक्षण घेऊन विशेष शाळेत विशेष शिक्षक म्हणूनही काम करता येते.
७. बी.एड. नंतर पदविका स्तरावर अधिव्याख्याता म्हणून काम करता येते.
८. पदवी प्राप्त केल्यानंतर स्वतः व्यावसायिक म्हणून विशेष शिक्षण क्षेत्रात कार्य करता येते.

१.२. शिक्षणक्रमाची उद्दिष्ट्ये:

१. मानवी विकास, भारतीय शिक्षण, शालेय विषयासंदर्भातील शिक्षणशास्त्र आणि अध्ययनाचे मूल्यनिर्धारण याविषयी ज्ञान व कौशल्ये आत्मसात करणे.

२. विविध अपंगत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अपंगत्वाचे स्वरूप व त्यांच्या शैक्षणिक गरजा याबाबत ज्ञान व कौशल्ये आत्मसात करणे.
३. विविध अपंगत्व असणाऱ्या मुलांबरोबर विशेष व समावेशित परिस्थितीत काम करण्यासाठी शैक्षणिक तरतुदी व कौशल्ये यांबाबत संकल्पनात्मक आकलन करणे.
४. व्यावसायिक विकासासाठी ज्ञान व कौशल्ये वृद्धिंगत करणे.

१.३. प्रवेश नियम भारतीय पुर्नवास परिषद, नवी दिल्ली

भारतीय पुर्नवास परिषद, नवी दिल्ली यांच्या नियमानुसार शैक्षणिक पात्रता

१. युजीसी मान्यताप्राप्त विद्यापीठाची मानव्यविद्या, सामाजिक शास्त्रे, विज्ञान किंवा वाणिज्य विद्याशाखेतील पदवी किंवा पदव्युत्तर पदवीस किमान ५० टक्के गुण अनिवार्य (४९.५ पेक्षा अधिक) अध्ययन आधार केंद्राने UGC मान्यता प्राप्त विद्यापीठ यादी UGC च्या वेबसाईटवरून काढून घ्यावी. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. समक - २००७/(C२६/०७) मशी-६ दि. २८/०२/२००७ प्रमाणे साहित्य सुधाकर ही पदवी प्रवेशासाठी पात्र धरण्यात येतील.

किंवा

इंजिनिअरिंग किंवा टेक्नॉलॉजीतील पदवी किंवा पदव्युत्तर पदवी असल्यास किमान ५५ टक्के गुण (५४.५० पेक्षा अधिक) अनिवार्य. (वैद्यकीय संबंधित व्यावसायिक शिक्षणक्रम)

२. राखीव प्रवर्गासाठी वरील दोन्ही परिक्षेत्रात ५ टक्के गुण म्हणजेच (४४.५० पेक्षा अधिक) सवलत देण्यात येईल.
३. महाराष्ट्र राज्याच्या बाहेरील अर्जदारांचा प्रवेश हा खुल्या प्रवर्गातून करण्यात येईल.
४. अर्जदाराने शैक्षणिक पात्रता व्यतिरिक्त शिक्षण घेतले असल्यास खालील तक्ता क्र. १.० तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे शिक्षणक्रम स्तरानुसार अतिरिक्त गुण देण्यात येतील.
५. अर्जदाराने प्रमाणपत्र शिक्षणक्रम पूर्ण केलेलला असेल तर त्याचा कालावधी किमान सहा महीने व अंतिम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
६. अर्जदाराकडे एका स्तरातील एका पेक्षा जास्त पदवी किंवा पदव्युत्तर पदवी असल्यास एका पदवीचे गुण ग्राह्य धरण्यात येतील.
७. उमेदवाराने कोणतेही कागदपत्र चुकीचे व खोटे सादर केल्यास अर्जदारावर विद्यापीठामार्फत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच आपले शुल्क परत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

महत्वाची सूचना:

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे शिक्षणक्रम पूर्ण केलेले असल्यास CGPA वरुन टक्केवारी काढण्यासाठी CGPA X 10 – 7.5 हे सूत्र वापरुन टक्केवारी काढावी.

१. ज्या अर्जदारांच्या पदवीच्या आणि पदव्युत्तर पदवीच्या गुणपत्रकामध्ये CGPA आणि SGPA असल्यास आपण ज्या विद्यापीठातून आपली पदवी उतीर्ण झाले असल्यास गुणपत्रकाच्या मागच्या बाजूला टक्केवारी काढण्यासाठीचे सूत्र दिले असल्यास त्याप्रमाणे टक्केवारी काढून ती अर्जात भरणे अपेक्षित आहे. गुणपत्रकाच्या मागच्या बाजूला विद्यापीठाचे सूत्र उपलब्ध नसल्यास आपल्या विद्यापीठाच्या समकक्ष विभागातून (Equivalence) टक्केवारीचे समकक्षतेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२. गुणपत्रकावर प्राप्त गुणांची नोंद असल्यास त्यांची बेरीज करून त्यावरून टक्केवारी काढून नोंदवावी.

३. लिंग Transgender निवडले असल्यास अर्जदारांनी शासकीय सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

तक्ता.क्र. १.० अर्जदाराला अर्ज करताना शिक्षणक्रम स्तरानुसार खालील प्रमाणे अतिरिक्त गुण दिले जातील.

अ. क्र.	**पदवी**	**गुण**	**पदव्युत्तर पदवी**	**गुण**
१.	पदवी ही प्रवेशासाठी पात्रता असणार आहे. त्याकारणाने पदवीच्या टक्केवारी नुसार गुण दिले जाणार नाहीत.	०	३९.५ ते ४९.४९	३
			४९.५० ते ५९.४९	४
			५९.५० ते ७४.४९	५
			७४.५० त्यापेक्षा जास्त	६
२.	**UGC मान्य इतर विद्यापीठाची संशोधन पदवी पीएच.डी. यशस्वीपणे पूर्ण केलेली असल्यास**			४
३.	भारतीय पुनर्वास परिषद मान्य पदवी	३	भारतीय पुनर्वास परिषद मान्य पदविका	२
४.	विशेष मुलांचे पालक आसल्यास (पाल्य ४०% दिव्यांग असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सकाचे प्रमाणपत्र असणे अनिवार्य.)	५	स्वतंत्र सैनिक/प्रकल्प ग्रस्त/घटस्फोटीत विधवा/ भूकंपग्रस्त	२

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे शिक्षणक्रम पूर्ण केलेले असल्यास बी.एड. विशेष शिक्षण प्रवेशासाठी मिळणारे अतिरिक्त गुण

प्रमाणपत्र शिक्षणक्रम	पदविका शिक्षणक्रम	पदवी शिक्षणक्रम	पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम	संशोधन पदवी पीएच.डी.
२ गुण	३ गुण	४ गुण	५ गुण	६ गुण

आरक्षण तक्ता :

बी. एड. विशेष शिक्षणक्रमासाठी प्रवेश देताना महाराष्ट्र शासनाच्या आरक्षणाच्या नियमानुसार भरण्यात येईल.
अ) प्रचलित शासन निर्णयानुसार ज्या जातींना जात प्रमाणपत्र,वैध असलेले नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र (**१ एप्रिल २०२६ नंतरचे असणे आवश्यक आहे.**), (जात पडताळणी दाखला) आवश्यक आहे, आरक्षणाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. त्यांनी त्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती अंतिम प्रवेशाच्यावेळी मूळ प्रमाणपत्रासह सादर करणे अनिवार्य राहील, अन्यथा संबंधित अर्जदाराचा समावेश खुल्या संवर्गात करण्यात येईल.
ब) वैध असलेले नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र हे शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या निर्णयानुसार असणे अनिवार्य राहील.

क) **शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या शासन निर्णयानुसार समावेश करण्यात आलेल्या संवर्गनिहाय जाती, उपजाती तसेच संवर्गाबद्दल त्या त्या निर्णयानुसार आरक्षणासाठी पात्र राहतील.**

टीप : १) घटनात्मक आरक्षण महाराष्ट्रातील निवासी अर्जदारास लागू राहील. निवडयादी मध्ये प्रथम समांतर आरक्षण लागू होईल, त्यानंतर खुला प्रवर्ग व सामाजिक आरक्षण लागू करून यादी प्रसिद्ध करण्यात येईल.
२) आरक्षणाच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

दिव्यांग व्यक्तींच्या प्रवेशासंदर्भात :- महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२ / विशि-३, प्रसिद्ध दिनांक २७ ऑगस्ट २०१८ नुसार दिव्यांग व्यक्तीच्या शिक्षणासाठी शासनाने ५ % आरक्षण ठेवलेले आहे. ते पुढीलप्रमाणे असेल दिव्यांगाच्या गुणवत्तायादीत १ % अल्पदृष्टी, १% कर्णबधिर, १% अस्थिव्यंगाचा, १ % मंदबुद्धी, १ % बौद्धीक अक्षमता आणि बहुअपंगत्व या दिव्यांगांचा समावेश असेल. त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील प्रवेशेच्छुकांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करण्यात येते. **काही तक्रार असल्यास त्याबाबत जाहिरात प्रसिद्धीपासून आठ दिवसात कुलसचिव यःच.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक यांना कळवावे.** त्यानंतरच्या त्यासंदर्भातील कोणत्याही तक्रारी विचाराधीन नसतील. दिव्यांग, अनाथ, आजी माजी सैनिक आरक्षण अंतर्गत असल्यामुळे प्रथम गुणवत्तेनुसार या जागा भरल्या जातील व भरलेल्या जागा ज्या संवर्गाच्या असतील तेवढ्या जागा नियमित प्रवेशाच्या जागांमधून कमी होतील.

सामाजिक आरक्षण तक्ता.क्र. १.१

सामाजिक आरक्षण						**समांतर आरक्षण**
अ.क्र.	**संवर्ग**	**आरक्षण %**	**एकूण जागा**	**जनरल**	**महिला ३०%**	
१.	खुला प्रवर्ग	३०%	१५	१०	०५	दिव्यांग ५% अनाथ १% आणि आजी, माजी सैनिक २% (Ex-Serviceman
२.	अनुसूचित जाती (SC)	१३%	०६	०४	०२	
३.	अनुसूचित जमाती (ST)	०७%	०४	०३	०१	
४.	विमुक्त जाती (VJ-A)	०३%	०२	०१	०१	
५.	भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) (NT-B) (1)	२.५%	०२	०१	०१	
६.	भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) (NT-C) (2)	३.५%	०१	०१	००	
७.	भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) (NT-D) (3)	०२%	०१	०१	००	
८.	इतर मागासवर्गीय (OBC)	१९%	०९	०६	०३	
९.	**EWS** (Open – अल्प उत्पन्न)	१०%	०५	०३	०२	
१०.	**SEBC** शासन निर्णय लागू राहील.	१०%	०५	०३	०२	
एकूण		१००%	५०	३३	१७	

शासन निर्णयानुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या ३० % जागा महिला अर्जदारांकरिता राखीव राहतील.

विशेष मागास प्रवर्गाबाबतची (S.B.C) तरतूद:

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र टीईएम/३३९७-१२९२६-(९०८६)/तांशी-१, दि.११ जुलै, १९९७ नुसार आरक्षित जागा एकूण ५० टक्के करण्यात आल्या आहेत. या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार

१. विशेष मागास प्रवर्गात ज्या जाती आहेत. त्यापैकी काही जाती इतर मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट होत्या. त्यामुळे सुरुवातीस विशेष मागास प्रवर्गाच्या प्रमाणपत्रधारक अर्जदारांची जात त्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट होती, त्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासाठी पात्र समजण्यात येईल.
२. गुणवत्ता यादीनुसार प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त दोन टक्क्यापर्यंत विशेष मागासवर्गीय अर्जदारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल.

टीप: मागासवर्गीय प्रवर्गातील काही जागा रिक्त राहिल्यास त्या खालील गटातील अंतर्गत बदलाने भरल्या जातील.

सामाजिक आरक्षणाच्या जागांचे संक्रमण तक्ता : क्र. १.२

गट अ	अनुसूचित जाती व नवबौद्ध (SC)	अनुसुचित जमाती (ST)
गट ब	विमुक्त जाती (VJ-A)	भटक्या जमाती (NT-B) (1)
गट क	अ)भटक्या जमाती (NT-C)(2)	भटक्याजमाती (NT-D)(3)
	ब)इतर मागासवर्गीय जाती(OBC)	

१. VJ-A/NT-B/NT-C उमेदवार उपलब्ध नसल्यास आणि NT-D चा अर्जदार उपलब्ध असल्यास ती जागा NT-D ला देण्यात यावी. त्यानंतर पुढीलप्रमाणे अंतर्गत निवड करण्यात येईल.
२. राखीव प्रवर्गातील वरील हस्तांतरातही अर्जदार उपलब्ध न झाल्यास पुढीलक्रमाने त्यांचे हस्तांतरण होईल.

VJ A ⟶	NT B
NT C ⟶	NT D

३. राखीव प्रवर्गातील सर्व अर्जदार संपल्यास २ टक्के जागा SBC ला देण्यात याव्यात. राखीव प्रवर्गातील अर्जदार संपल्यानंतरच त्या जागा खुल्या प्रवर्गासाठी हस्तांतरित करण्यात याव्यात.

एकूण प्रवेश संख्या : भारतीय पुनर्वास परिषदेच्या मान्यतेनुसार विद्यापीठातर्फे ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. अध्ययन अधार केंद्रनिहाय प्रवेश क्षमता ५० इतकी भारतीय पुनर्वास परिषद आणि य. च. म. मुक्त विद्यापीठाने मान्य केल्याप्रमाणे या पुस्तिकेत शेवटी दर्शविण्यात आली आहे.

प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिये विषयी :

बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबबिली जाणार आहे.

१. बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या सन २०२६-२९ शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी http://ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर जा.
२. 'प्रवेशअर्ज नोंदणीसाठी अर्जदार नवीन असेल तर Fresher student वर क्लिक करून New user Register या बटनावर क्लिक करावे. अर्जदाराच्या मोबाईल क्रमांक आणि ई मेल आय डी वर OTP येईल. दोन्ही OTP वेगवेगळे असतील. प्रवेश अर्ज भरताना ते नमूद करावे लागतील. किंवा अर्जदार मुक्त विद्यापीठाचा सन २०२५ पासूनचा विद्यार्थी असल्यास आपला 25/26 पासून सुरू होणारा १६ अंकी PRN No. व passward (DDMMYY) टाकून Registered student या बटनावर क्लिक करून Login करावे.
३. माहिती भरल्यानंतर आपल्याला एक युजर आय डी आणि पासवर्ड तयार करावा लागेल.

४. अर्जदाराने आपला युजर आईडी आणि पासवर्ड व्यवस्थित जतन करावा.
५. प्रवेश अर्ज भरताना स्क्रीन वर प्रदर्शित होणाऱ्या सुचनांचे काळजीपूर्वक वाचन करा.
६. प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी, माहितीपुस्तिका व संबंधित ऑनलाईन माहिती काळजीपूर्वक वाचा.
७. प्रवेश अर्ज इंग्रजी भाषेत भरा.
८. आधार कार्ड प्रमाणे प्रवेश अर्जात अर्जदाराचे नाव प्रविष्ट करा.
९. स्क्रीनवर दिसणाऱ्या रिकाम्या जागेतील आवश्यक माहिती अचूक भरा.
१०. अर्जामध्ये पुढील माहिती भरणे आवश्यक आहे.

अ. व्यक्तिगत माहिती, आ. संपर्काबद्दल माहिती, इ. शैक्षणिक अर्हता, ई. स्वतःचा फोटो, उ. सहीची स्कॅन कॉपी, ऊ. ABC ID आणि DEB ID ए. इतर आवश्यक माहिती.

१. वरील सर्व माहिती नोंदविल्या शिवाय अर्जाची पूर्तता होणार नाही. ही माहिती नोंदविताना नावाचे इंग्रजी/मराठी स्पेलिंग काळजीपूर्वक भरावे. तसेच स्वतःचा चालू असणारा ई-मेल, मोबाईल क्रमांक द्यावा कारण विद्यापीठाकडून होणारा सर्व प्रकारचा संपर्क ह्याच क्रमांकावर करण्यात येईल.
२. अर्जदारच्या नावात बदल केलेला असेल तर संबंधित दस्ताऐवज (उदा. राजपत्र) कागदपत्र पडताळणीच्या वेळेस सोबत ठेवावे.
३. अर्जदार EWS/SEBC प्रवर्गातून अर्ज केला असेल तर EWS/SEBC चे प्रमाणपत्र संबंधित शैक्षणिक वर्षात वैध असणे आवश्यक आहे.
४. अर्जदाराकडून चुकीची किंवा अनावश्यक माहिती अर्जात भरलेली असल्यास ती स्वयं संपादनाच्या कालावधीतच दुरुस्त करता येईल. तसेच अर्जदार मुक्त विद्यापीठाचा विद्यार्थी असल्यास व्यक्तिगत माहीतीत स्वयं संपादन करता येणार नाही.
५. अर्जदारास एकापेक्षा जास्त अध्ययन आधार केंद्रावर अर्ज सादर करावयाचा असल्यास तसे किमान १ व कमाल ३ केंद्रास प्राधान्यक्रम द्यावेत. प्राधान्यक्रम नुसार प्रवेश अर्ज शुल्कतक्ता पुढे दिलेला आहे.
   प्रवेश प्रक्रिया शुल्क खुल्या प्रवर्गासाठी**रुपये १०००/- आणि राखीव प्रवर्गासाठी रुपये ५००/- इतके** आहे. सदरचे शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहे. अर्जदाराला एकापेक्षा जास्त अध्ययन आधार केंद्रावर अर्ज सादर करावयाचा असल्यास **तक्ता.क्र. १.३** प्रमाणे प्रवेश अर्ज शुल्क लागू राहील.

तक्ता.क्र. १.३

अनु.क्र.	**प्रथम प्राधान्यक्रम प्रवेश प्रक्रिया शुल्क रु.**		**प्रथम आणि द्वितीय प्राधान्यक्रम प्रक्रिया शुल्क रु.**		**प्रथम, द्वितीय आणि तृतीय प्राधान्यक्रम प्रवेश प्रक्रिया शुल्क रु.**	
१.	सामाजिक आरक्षण प्रवर्गासाठी शुल्क रु.	खुला प्रवर्गासाठी शुल्क रु.	सामाजिक आरक्षण प्रवर्गासाठी शुल्क रु.	खुला प्रवर्गासाठी शुल्क रु.	सामाजिक आरक्षण प्रवर्गासाठी शुल्क रु.	खुला प्रवर्गासाठी शुल्क रु.
	५००/-	१०००/-	७००/-	१२००/-	९००/-	१४००/-

१७. अर्जदारने अर्जाची प्रिंटआउट काढून तसेच संबंधित कागदपत्रांचा मूळ संच आणि एक झेरॉक्स संच कागदपत्र पडताळणीच्या वेळेस सोबत ठेवावी.
१८. आपला युजर आईडी आणि पासवर्ड व्यवस्थित जतन करा, कारण कागदपत्र पडताळणी समितीस त्याशिवाय कागदपत्र पडताळणी करता येणार नाही.

१९. या शिक्षणक्रमासाठीच्या निवड यादीबाबत अर्जदारांना केवळ विद्यापीठ संकेतस्थळावरूनच कळवले जाईल. तसेच सदर यादी विद्यापीठ संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध करण्यात येतील. तसा मेसेज अर्जदाराला प्रवेशासाठी भरलेल्या ऑनलाईन प्रवेश-अर्जात नोंदविलेल्या मोबाईलवर पाठविण्यात येईल. बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यापीठ संकेतस्थळास भेट देण्याची जबाबदारी अर्जदाराची असेल.

२०. आपण आपले प्रथम वर्षाचे वैकल्पिक अभ्यासक्रम निवडल्या नंतर शिक्षणक्रम शुल्क भरून आपला प्रवेश निश्चित करावयाचा आहे.

महत्वाची सूचना : बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम प्रवेश प्रक्रिया ही online असते. अर्जदारांनी प्रवेशअर्ज स्वत: भरावे. विद्यापीठ online पद्धतीने शुल्क आकारत असते. इतरत्र कोठेही अध्ययन आधार केंद्रावर अथवा इतर कोणत्याही व्यक्तीला पैसे देऊ नयेत, तसेच कोणत्याही अमिशाला बळी पडू नये. कोणत्याही व्यक्तीने आपल्याकडे शुल्काव्यतिरिक्त पैसे मागणी करीत असल्यास आपण मा. कुलसचिव य.च.म.मुक्त विद्यापीठ येथे लेखी तक्रार नोंदवावी. अन्यथा आपण इतरत्र कोणाला पैसे दिले असल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

प्रवेश पूर्व चाचणी सबंधित माहिती :

सदर शिक्षणक्रमाला प्रवेश घेण्यासाठी प्रवेश पूर्व चाचणी देणे अनिवार्य आहे. विद्यापीठाच्या मुख्यालयात अर्जदाराची ५० गुणाची पर्यवेक्षकच्या निरीक्षणाखाली ऑनलाईन प्रवेश पूर्व चाचणी घेण्यात येईल. खालील तक्त्यात प्रवेश पूर्व चाचणीचे घटकनिहाय गुण नमूद केलेले आहेत. प्रवेश पूर्व चाचणीच्या गुणांचा समावेश गुणवत्ता यादी मध्ये केला जातो.

सन २०२६-२९ तुकडीसाठी बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम प्रवेश पूर्व चाचणी पाठ्यक्रम

अनु.क्र.	घटक	प्रश्नसंख्या	प्रत्येकी गुण	गुण
१.	सामान्य ज्ञान	०५	२	१०
२.	मानसिक योग्यता	०५	२	१०
३.	शिक्षक अभियोग्यता	१०	२	२०
४.	शिक्षणक्रम आशय	०५	२	१०
	एकूण	२५		५०

- सामान्य ज्ञान घटकात - भूतकाळातील घटना, विज्ञान आणि तंत्रज्ञान, इतिहास, चालू घडामोडी, भूगोल, नागरिकशास्त्र, राज्यशास्त्र आणि सर्वसाधारणपणे साहित्य समाविष्ट केले जाईल.
- मानसिक योग्यता घटकात - नातेसंबंध, उपमा, वर्गीकरण, मालिका, शब्दलेखन, आणि अशाच गोष्टी मानसिक क्षमता विभागात समाविष्ट केल्या जातील.
- शिक्षक अभियोग्यता घटकात - इतर विषयांसह शिक्षण आणि समाज, संप्रेषण आणि व्यावसायिक बांधिलकी विषयी प्रश्न समाविष्ट केले जातील.

- शिक्षणक्रम आशय या घटकात - विशेषतः विशेष शिक्षण, बांधिलकी आणि कर्तव्य विषयी प्रश्न समाविष्ट केले जातील.

महत्वाच्या सूचना :

- प्रवेश पात्रता चाचणी ही बहुपर्यायी प्रश्न स्वरुपाची आहे. या चाचणीमध्ये प्रत्येक प्रश्नास चार पर्याय असतील.
- आपणास या चाचणीसाठी ३० मिनिटे इतका कालावधी असेल.
- चाचणीचे प्रश्न हे द्विभाषीक (मराठी आणि इंग्रजी) स्वरूपाचे असतील.
- गुणवत्ता यादीनुसार अध्ययन आधार केंद्रनिहाय विद्यार्थ्यांची कागदपत्र पडताळणी ही विद्यापीठाच्या मुख्यालयात केली जाईल.
- विद्यापीठाने गठित केलेल्या समितीद्वारे आपली कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र असलेला अर्जदार प्रवेश पूर्व चाचणीसाठी पात्र ठरेल.

निवड प्रक्रीये संबधित माहिती :

अर्जदाराची प्रवेश निश्चिती ही खालील घटकनिहाय गुणांचा एकत्रित गुणांच्या आधारावर गुणवत्ता यादी तयार केली जाते.

१. पदवीचे गुण
२. शैक्षणिक पात्रतेच्या आधारे आणि इतर निकषांच्या आधरे मिळणारे अतिरिक्त गुण
३. प्रवेश पूर्व चाचणीचे गुण
४. वरील तिन्ही घटकांचे गुण एकत्र मिळवून गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
५. खुल्या प्रवर्गातील अर्जदारास **पदवी परीक्षेत ४९.५० टक्क्यांपेक्षा कमी गुण आणि सामाजिक आरक्षण लागू असलेल्या अर्जदारास ४४.५० पेक्षा कमी गुण** असतील तर त्याचा प्रवेश **पदव्युत्तर पदवीच्या** आधारावर देण्यात आला असेल, अशा अर्जदारास पदव्युत्तर पदवीसाठीच्या **अतिरिक्त गुणांचा लाभ दिला जाणार नाही.**
६. प्रथम निवड यादी ही समांतर आरक्षण लागू करून पात्र अर्जदाराची निवड यादी अभ्यासकेंद्र निहाय प्रसिद्ध केली जाईल.
७. सामाजिक आरक्षण लागू करून द्वितीय निवड यादी अध्ययन आधार केंद्र (LSC) निहाय अर्जदाराच्या गुणवत्तेच्या आधारे प्रसिद्ध केली जाईल.
८. द्वितीय यादी मध्ये जागा रिक्त राहिल्यास प्रथम गुणवत्तेच्या आधारावर तसेच अर्जदाराचा अध्ययन आधार केंद्र (LSC) प्राधान्यक्रम विचारात घेऊन सामाजिक आरक्षण लागू करून आवश्यक असल्यास महाराष्ट्र शासन नियमानुसार जागा हस्तांतरित करून तृतीय निवड यादी अभ्यासकेंद्र निहाय प्रसिद्ध केली जाईल.
९. याचप्रमाणे उर्वरित जागांसाठी प्रवेश फेरी आवश्यकतेनुसार कार्यान्वित करून याद्या प्रसिद्ध करण्यात येतील.
१०. गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाल्यानंतर निवड झालेल्या अर्जदाराने शिक्षणक्रमाचे संपूर्ण शुल्क हे वर्षनिहाय विद्यापीठाकडे ऑनलाईन पद्धतीने जमा करावयाचे आहे. आपण प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमाचे शुल्क **तक्ता.क्र. १.४** मध्ये नमूद केल्याप्रमाणे भरणे अनिवार्य आहे.

११. निवड झाल्यावर संबंधित शिक्षणक्रमाचे शुल्क भरण्यापूर्वी आपण आपले प्रथम वर्षाचे वैकल्पिक अभ्यासक्रम निवडण्यासाठी माहिती पुस्तिकेतील पृष्ठ क्र. १९ व २० वरील माहिती वाचा व काळजीपूर्वक अभ्यासक्रम निवडून खात्री करून घ्यावी, नंतर हा अभ्यासक्रम बदलता येणार नाही.

१२. विद्यापीठ हिस्सा व अध्ययन आधार केंद्र हिस्सा हा एकाचवेळी भरावयाचे असल्याने शुल्क भरण्याबाबतच्या सूचनेनुसार प्रवेश अर्जात दिलेल्या लिंकवरून सदरचे ऑनलाईन पेमेंट गेटवे वापरून क्रेडीट/ डेबिट कार्ड/ नेट बँकिंग द्वारे शुल्क भरावयाचे आहे या व्यतिरिक्त कोणतेही शुल्क अभ्यासकेंद्रावर भरावयाचे नाही.

१३. विद्यापीठाने घेतलेले धोरणात्मक नियम वेळोवेळी लागू करण्यात येतील.

१४. अर्जदाराला प्रवेश प्रक्रिये संदर्भात अडचणी असल्यास विद्यापीठाच्या नोंदणी कक्षास संपर्क करावा.

१५. गुणवत्ता यादीत जर समान गुण असतील तर प्रथम दिव्यांग मुलाचे पालक यांचा विचार केला जाईल. त्यानंतरही समान गुण झाल्यास वयानुसार जेष्ठता विचारात घेतली जाईल. जर ते समान असेल तर ज्यांनी प्रथम पदवी प्राप्त केली असेल त्यांना प्राधान्य मिळेल. त्यानंतरही समान गुण झाल्यास पदवीचे गुण विचारात घेण्यात येतील यानंतर प्रवेश पूर्व चाचणीचे गुण यावरून निवड होईल. यानंतर गुणवत्ताक्रम ठरविण्याचा अधिकार निवड समितीकडे राहील व तो अंतिम असेल.

१६. अर्जदाराने चुकीचे कागदपत्र सादर करुन प्रवेश घेतलेले निदर्शनास आल्यास विद्यार्थ्याचा प्रवेश कोणत्याही टप्यावर रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेले आहेत.

लक्षात ठेवा:

- अर्जदाराने या शिक्षणक्रमाला अध्ययन आधार केंद्रावर प्रवेश घेतल्यानंतर आपल्या online प्रवेश अर्जाची प्रिंट घ्यावी. तसेच प्रवेश शुल्काची ई-चलन पावती आपल्या नोंदणीकृत मेल-आयडीवर प्राप्त होईल.
- प्रवेश प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यानुसार वेळोवेळी दिलेल्या कार्यवाही संदर्भातील सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर पहाव्यात.

शिक्षणक्रम शुल्क :

बी.एड. (विशेष शिक्षण) शिक्षणक्रम (P21)

तक्ता.क्र. १.४

क्र.	शुल्क तपशील	प्रथम वर्षे	द्वितीय वर्षे	तृतीय वर्ष
Part : A				
१	Registration	200	200	200
२	Eligibility	100	0	0
३	Identity card	10	0	0
४	Prospectus	50	50	50
५	e-Suvidha/e-Service	118	118	118
६	Library	10	10	10

७	Chancellor's office event	38	38	38
८	Sport	50	50	50
९	DSW	50	50	50
१०	Disaster management	10	10	10
११	NSS	10	10	10
१२	Alumni	0	0	10
१३	Sanvad	10	10	10
१४	Graduation/Convocation	0	0	450
१५	Student insurance	20	20	20
		676	**566**	**1026**
	Part : B			
१६	**Tuition**	**प्रथम वर्षे**	**द्वितीय वर्षे**	**तृतीय वर्ष**
	University Share *	12002	7922	3602
	Study Centre Share	8000	5280	2400
१७	Exam	2240	2040	1060
Total : Part A + Part B (प्रथम वर्ष + द्वितीय वर्ष + तृतीय वर्ष)		22,918**/-**	15,808**/-**	8,088**/-**

***University Share मधून १०% रक्कम विद्यापीठ व RCI MOU नुसार RCI कडे पाठविण्यात येतील.**

अर्जदाराने घ्यावयाची दक्षता

१. कागदपत्रांची पडताळणी मुख्यालयात करण्यात येईल. त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास प्रवेश प्रक्रिया समिती कडून आपला प्रवेश रद्द केला जाईल. त्यामुळे प्रवेश अर्जात योग्य व सत्य माहिती भरणे तसेच प्रवेशा संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रत सोबत जोडणे ही सर्वस्वी अर्जदाराची जबाबदारी असून, चुकीची माहिती भरल्यामुळे प्रवेश रद्द झाल्यास त्यासाठी संबंधित अर्जदार स्वत: जबाबदार राहील.

शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी मिळण्यात येणारी शिष्यवृत्ती बाबत

बी. एड. विशेष शिक्षणक्रमासाठी शिष्यवृर्ती योजना ही केंद्र व राज्य शासनाची असून, मुक्त विद्यापीठ त्यासाठी दुव्याचे काम करते. ही योजना शासनाची असल्यामुळे अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) इतर मागासवर्ग (OBC) विशेष मागास प्रवर्ग SBC आर्थिकदृष्या प्रवर्गाच्या (EWS) विद्यार्थ्यांना व्यक्तींनाच याचा लाभ घेऊ शकता. अशा विद्यार्थ्यांसाठी शासनाने काही अटी व शर्ती तयार केल्या आहेत. या अटी / शर्तीच्या आधारे मुक्त विद्यापीठात प्रवेशित / प्रवेश घेऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यासाठी नियमावली विद्यापीठाच्या संकेतस्थळावर https://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=1269 प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. ती नियमावली वाचून https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक राहील. विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित झाल्यास आवश्यक कार्यवाही करून सवलत मिळविता येईल. मात्र विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे आणि अध्ययन आधार केंद्राचे संपूर्ण शुल्क भरून शासनाकडून शिष्यवृत्तीमार्फत शिक्षणक्रम शुल्क परतावा घेता येईल.

Acadamic Bank of Credts ID आणि Distance Education Bureau Identification Number DEB ID तयार करण्याबाबतची सूचना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार आपणास Academic Bank of Credits ID आणि **DEB ID** तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेले प्रमाणपत्र पदविका पदवीची माहिती Digi locker (ABC-NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडीट ट्रान्सफार करता येणार नाहीत. आपणास Academic Bank of Credits ID नोंदणी http://www.abc.gov.in **DEB ID साठी** https://deb.ugc.ac.in या पोर्टल वर करता येईल. तसेच आपल्या विद्यापीठाच्या www.ycmou.ac.inया संकेतस्थळाला भेट द्या. या संकेतस्थळावरील Student Zone या बटनाला क्लिक करा यातील Academic Bank of Credits ID वर क्लिक केल्यानंतर Academic Bank of Credits ID तयार करण्यासंबधित माहिती व PPT सादरीकरण आपणासाठी उपलब्ध केलेले आहे.

शिक्षणक्रम संरचना

अ) श्रेयांक : ८० (१ श्रेयांक म्हणजे ३० ते ३५ तासांचा अभ्यास)

आ) अभ्यास तासिका : २४००-२६०० घड्याळी तास

इ) शिक्षणक्रम कालावधी : सदर शिक्षणक्रमात पाच सत्रे म्हणजेच दोन वर्ष सहा महीने (अडीच वर्ष) किमान कालावधी असेल. शिक्षणक्रमाचा **नोंदणी कालावधी पाच वर्षांचा असेल**. या कालावधीत शिक्षणक्रम यशस्वीपणे पूर्ण न झाल्यास अर्जदारास भारतीय पुर्नवास परिषद (RCI) यांच्या सन २०१५ च्या नियम व अटी नुसार व विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार **पुननोंदणी** करता येणार नाही.

ई) शिक्षणक्रम : वर्षनिहाय संरचना

बी. एड. विशेष शिक्षण (HI)`

अ क्र	अभ्यासक्रम संकेतांक	RCI संकेतांक	अभ्यासक्रम	तात्विक (T)/ प्रात्यक्षिक(P)	अभ्यास तासिका	श्रेयांक	गुण
प्रथम वर्ष - (प्रथम सत्र)							
१	EDU281	A1	मानवी वाढ आणि विकास	तात्विक (T)	१३०	४	१००
२	EDU282	A2	भारत आणि समकालीन शिक्षण	तात्विक (T)	१३०	४	१००
३	EDU292	B7	सांवेदिक अपंगत्वाची ओळख	तात्विक (T)	६५	२	५०
४	EDU293	B8	मज्जासंस्था विकासासंबंधित अपंगत्वाची ओळख	तात्विक (T)	६५	२	५०
५	EDU294	B9	चलनवलनविषयक अपंगत्व व बहुअपंगत्वाची ओळख	तात्विक (T)	६५	२	५०
६	EDU332.1	E1	क्रॉस डिसॅबिलीटी अँड इन्क्लुजन	प्रात्यक्षिक (P)	६५	२	५०
द्वितीय सत्र							
१	EDU283	A3	अध्ययन,अध्यापन आणि मूल्यनिर्धारण	तात्विक (T)	१३०	४	१००
२	EDU341	A4	विषय अध्यापनाचे शिक्षणशास्त्र (शास्त्र)	तात्विक (T)	१३०	४	१००
or	EDU342	A4	विषय अध्यापनाचे शिक्षणशास्त्र (गणित)	तात्विक (T)	१३०	४	१००
or	EDU343	A4	विषय अध्यापनाचे शिक्षणशास्त्र (इतिहास)	तात्विक (T)	१३०	४	१००

	EDU344	A4	विषय अध्यापनाचे शिक्षणशास्त्र (भूगोल)	तात्विक (T)	१३०	४	१००
३	EDU291	B6	समावेशित शिक्षण	तात्विक (T)	६५	२	५०
४	EDU321	C12	मूल्यनिर्धारण आणि गरजांची ओळख	तात्विक (T)	१३०	४	१००
५	EDU333.1	E2	अपंगत्व विशेषीकरण	प्रात्यक्षिक (P)	६५	२	५०
			एकूण		**१०४०**	**३२**	**८००**
			द्वितीय वर्ष - (तृतीय सत्र)				
१	EDU346	A5	विषय अध्यापनाचे शिक्षणशास्त्र : मराठी	तात्विक (T)	१३०	४	१००
or	EDU347	A5	विषय अध्यापनाचे शिक्षणशास्त्र : हिंदी	तात्विक (T)	१३०	४	१००
	EDU348	A5	विषय अध्यापनाचे शिक्षणशास्त्र : इंग्रजी	तात्विक (T)	१३०	४	१००
२	EDU322	C13	अभ्यासक्रम संरचना अनुकूलन आणि मूल्यमापन	तात्विक (T)	१३०	४	१००
३	EDU323	C14	हस्तक्षेपण आणि अध्यापन कार्यनिती	तात्विक (T)	१३०	४	१००
४	EDU333.2	E2	अपंगत्व विशेषीकरण	प्रात्यक्षिक (P)	१३०	४	१००
			चौथे सत्र				
१	EDU301	B10	मार्गदर्शन आणि समुपदेशन	तात्विक (T)	६५	२	५०
or	EDU302	B10	बालसंगोपन आणि शिक्षण	तात्विक (T)	६५	२	५०
or	EDU303	B10	वर्गाध्यापनात माहिती संप्रेषण व तंत्रज्ञानाचे उपयोजन (ICT)	तात्विक (T)	६५	२	५०
or	EDU304	B10	प्रौढ शिक्षण	तात्विक (T)	६५	२	५०
or	EDU305	B10	स्वयं सहाय्य गट आणि शिक्षण	तात्विक (T)	६५	२	५०
	EDU309	B10	ब्रेल आणि सहाय्यक साधने	तात्विक (T)	६५	२	५०
२	EDU324	C15	तंत्रज्ञान आणि अपंगत्व	तात्विक (T)	१३०	४	१००
३	EDU325	C16	मनोसामाजिक आणि कौटुंबिक समस्या	तात्विक (T)	६५	२	५०
४	EDU335	F1	मुख्य अपंगत्व (विशेष शाळेशी संबंधित अध्यापन)	प्रात्यक्षिक (P)	१३०	४	१००
५	EDU326	D17	आशयाचे वाचन आणि आकलन	तात्विक (T)	६५	२	५०
६	EDU327	D18	शिक्षणातील नाट्य आणि कला	तात्विक (T)	६५	२	५०
				एकूण	**१०४०**	**३२**	**८००**
